ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख १२ मार्च, १९५८ | अंक १०

## विविध माहिती

**आदिवासींसाठी शाळा**—मुंबई राज्याच्या झालोड व संबळपूर तालुक्यांतील आदिवासी लोकांसाठी आश्रमाच्या धर्तीवर चालणाऱ्या दोन शाळा स्थापन करण्यांत येणार आहेत. शाळेंत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व विद्यार्थिनींसाठी शाळेला जोडूनच एक वसतिगृह बांधण्यांत येईल. सरकार शाळेला ७२,००० रुपयांची मदत देणार आहे. शाळेंत ६० विद्यार्थ्यांची सोय होईल.

**प्राण्यांच्या मानसशास्त्राचा अभ्यास**— अहमदाबाद येथील प्राणिसंग्रहालयांत एका कुत्रीला तिच्या पिलांबरोबरच सिंहाच्या दोन छाव्यांना पाजण्याचें काम देण्यांत आलें आहे. हा प्रयोग ठीक चालला आहे. पण कुत्र्याचें पिलु रागावतांच सिंहाचीं पिलें दूर पळून जातात ! कुत्र्याच्या पिलाचें बाळपण १२ महिन्यांत संपतें व सिंहाचें ३० महिन्यांत संपतें त्याचा हा परिणाम असावा.

**कर्तबगार भारतीय**— अमेरिकेंतील टेक्सास सदर्न युनिव्हर्सिटीच्या पदार्थविज्ञान शाखेचे प्रमुख म्हणून डॉ. ए. राव ह्या भारतीय प्राध्यापकाची नेमणूक करण्यांत आली आहे. त्यांचें वय ३९ वर्षांचें आहे. डॉ. राव ह्यांनीं कोलंबो योजनेंतील शिष्यवृत्ति घेऊन ऑस्ट्रेलिआंत अभ्यास केलेला आहे.

**गिरण्या बंद होण्याचा संभव**— मुंबई गिरणीमालक-संघाचे अध्यक्ष श्री. रामनाथ पोदार ह्यांनीं अशी भीति व्यक्त केली आहे कीं, ह्या धंद्यावरील कराच्या ओझ्यामुळें मुंबईतील आणखी ४० ते ५० गिरण्या बंद होण्याचा संभव आहे. तसें झाल्यास सुमारें ५०,००० मजुरांना रोजगारास मुकावें लागेल असा त्यांचा अंदाज आहे.

**आंतरराष्ट्रीय योग-केंद्र**—विश्वायतन योगाश्रम संस्थेनें स्थापन केलेल्या आंतरराष्ट्रीय योगकेंद्राचें उद्घाटन उपराष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् ह्यांनीं केलें. ह्या प्रसंगीं बोलतांना डॉ. राधाकृष्णन् म्हणाले कीं, मानवी जीवनांत योगाच्या अभ्यासाची फार जरूरी आहे. त्याच्या अभ्यासामुळें शारीरिक व मानसिक आरोग्य आणि आध्यात्मिक शांति ह्यांचा लाभ होऊन मनुष्य पूर्णावस्थे-प्रत पोंचूं शकतो.

**कॅनडाकडून धान्याची खरेदी**—ओटावा येथील रशिअन वकिलातीनें एक पत्रक काढून कॅनडाकडून रशिआनें बार्ली हें धान्य विकत घेण्याचा करार केल्याचें प्रसिद्ध केलें आहे. ह्या धान्याची किंमत सुमारें ४० लाख डॉलर्स होईल. धान्याची खरेदी कॅनडांतील खाजगी व्यापाऱ्यांच्या संघटनेकडून करण्यांत आलेली आहे. त्याची पौंडांतील किंमत १४,३०,००० होईल.

**मद्रास राज्यांतील सिमेंटचे कारखाने**—दुसऱ्या पंच-वार्षिक योजनेच्या काळांत मद्रास राज्यांत सिमेंट तयार करणारे दोन नवीन कारखाने उभारण्यांत येणार आहेत. त्याचप्रमाणें जुन्या दोन कारखान्यांचा विस्तारहि करण्यांत येणार आहे. कार्यक्रमाच्या अखेरीस मद्रास राज्यांत दरसाल १३,६९,००० टन सिमेंट तयार होऊं लागेल.

**पॅरिसमधील भव्य इमारत**—संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या शिक्षण–शास्त्र व संस्कृतिविषयक उपसंघटनेसाठी पॅरिस शहरांत एक भव्य इमारत बांधण्यांत येत आहे. इमारतीचें काम आतां पूर्ण होत आलें आहे. तिच्या बांधकामासाठी ३० लाख पौंड खर्च येईल असा अंदाज आहे. बांधकामासाठी १८,००० टन काँक्रिट वापरण्यांत आलें आहे.

**रशिआंतील अन्नधान्याच्या किंमती**—रशिअन लोकांना खाव्या लागणाऱ्या अन्नधान्याच्या किंमतींत कपात करण्यांत येण्याचा संभव आहे. गेल्या चार वर्षांत सामुदायिक शेतीच्या उत्पन्नांत ३२ टक्के वाढ झाली असल्यानें आतां अशा शेतांना आपल्या मालकीचीं शेतीचीं आधुनिक अवजारें विकत घेणें शक्य झालें आहे. आतांपर्यंत हीं साधनें त्यांना सरकार पुरवीत असे व अन्नधान्याची सक्तीची वसुली करीत असे.

**सिमेंटचा सहकारी कारखाना**—आंध्र राज्यांत तंदूर ह्या गांवीं सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा सिमेंटचा कार-खाना काढण्याचे प्रयत्न चालू आहेत. रुमेनिआंतून आलेल्या तज्ज्ञांनीं ह्या गांवाची निवड केली आहे. कारखान्यासाठी लागणाऱ्या भांडवलाचा बराच मोठा भाग कामगारांकडून उभारण्यांत येणार आहे. सहकारी तत्त्वावर चालणारा हा सिमेंटचा पहिलाच कारखाना होईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**पोलादाचा चौथा कारखाना**—पुढील वर्षाच्या औद्योगिक विकासांत सार्वजनिक मालकीच्या विभागांत चौथा पोलादाचा कारखाना काढण्यासंबंधीं प्राथमिक तयारी करण्यांत येत आहे. हा कारखाना बोकॅरो येथें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत स्थापन करण्यांत येईल. त्याच्या प्राथमिक तयारीसाठी १९५८-५९ सालीं ५० लाख रुपये खर्च करण्यांत येतील.

**अमेरिकेंतील वृत्तपत्रांचा खप**—१९५७ सालीं अमेरिकेंत दररोज ५·८ कोटी वृत्तपत्रांच्या प्रती खपत होत्या. त्यापूर्वीच्या वर्षाशीं तुलना करतां खपांत १·८ टक्क्यांनीं वाढ झाल्याचें आढळून आलें. अमेरिकेंत सध्यां १९५६ दैनिकें आहेत. हा आकडा फक्त इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांचा आहे. इतर भाषेंतील दैनिकें वेगळीं.

**होमिऑपॅथी उपचारांचें इस्पितळ**—केरळच्या सरकारनें होमिऑपॅथी उपचारपद्धतीनें रोग्यांना उपचार करणारें इस्पितळ स्थापन करण्याची तयारी दाखविली आहे. केरळ राज्याचे आरोग्यमंत्री डॉ. ए. आर. मेनन हे स्वतः मात्र ॲलोपॅथीचा पुरस्कार करणारे आहेत. तथापि, कोणत्याहि उपचारपद्धतीनें रोग्यांना आराम वाटत असेल तर तिचा स्वीकार करावा, असें त्यांचें मत आहे.

**विजेच्या डब्यांना लागणारें सामान**—आणखी दोन वर्षांच्या अवधींत भारतांत रेल्वेच्या विजेच्या डब्यांना लागणारें सर्व प्रकारचें सामान तयार होऊं लागेल. सामान तयार करण्याचा कारखाना डमडम येथें असून त्या कामीं एका ब्रिटिश कारखान्याचें साह्य घेण्यांत आलें आहे. सध्यां हा कारखाना फक्त ४० टक्के भाग परदेशांतून आयात करतो.

**सिलोनला अमेरिकेची मदत**—सिलोनमध्यें गेल्या वर्षी झालेल्या पुरांत हजारों लोकांची वाताहत झाली. ह्या लोकांना मदत म्हणून अमेरिकेनें ४५,००,०० डॉलर्सची देणगी दिली आहे. ह्या रकमेचा विनियोग करून सिलोनचें सरकार गहूं व तांदूळ विकत घेणार आहे. एकूण सुमारें ३०,००० टन अन्नधान्य आयात करण्यांत येईल.

**विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सवलती**—मोठ्या शहरांतील उपनगर रेल्वेमार्गावर व इतर रेल्वेमार्गावर प्रवास करण्याबाबत विद्यार्थ्यांना ज्या सवलती मिळत असत त्याबद्दल कांहीं बदल करण्याचें रेल्वेबोर्डानें ठरविलें आहे. १ मे, १९५८ पासून प्रवासाच्या सवलतीच्या दराचा फायदा ज्या विद्यार्थ्यांचीं वयें २५ हून अधिक नाहींत, त्यांनाच मिळूं शकेल.

**नवीन कारखान्यांना सवलत**—मलायांत नव्यानें स्थापन करण्यांत येणाऱ्या कारखान्यांना ५ वर्षेपर्यंत करापासून माफी देण्यांत येईल असें मलायाच्या सरकारनें जाहीर केलें आहे. ह्या कालांत भागीदारांना वांटण्यांत येणाऱ्या नफ्यावर सुद्धां कराची आकारणी करण्यांत येणार नाहीं, असा खुलासा करण्यांत आला आहे.

**वजन नसलें तरी जीवन शक्य**—वजन नसलें तर जिवंत रहाणें शक्य आहे काय हें पाहण्यासाठी रशिआनें आपल्या दुसऱ्या उपग्रहांत कुत्रीला बसविलें होतें. ती कांहीं काळ जगूं शकली, ह्यावरून वजन नाहींसें झाल्यावर जगणें शक्य आहे हें सिद्ध झाल्याचें मत एका रशिअन शास्त्रज्ञानें व्यक्त केलें आहे.

**केंद्रीय शिक्षणखात्याची सूचना**—केंद्रीय शिक्षणखात्यानें राज्यसरकारांना एक सूचना पाठवून असें कळविलें आहे कीं, विद्यार्थ्यांत शिस्त बाणविण्याच्या दृष्टीनें शिक्षणसंस्थांनीं विद्यार्थ्यांना दररोज १० मिनिटें निस्तब्ध शांतता पाळण्याची संवय लावावी. बिहार सरकारचें शिक्षणखातें सूचनेचा विचार करीत आहे.

**अंदाजपत्रकाची अशी तऱ्हा नको**—लोकसभेंत रेल्वेच्या अंदाजपत्रकावर बोलतांना श्री. फँक ॲंथनी म्हणाले कीं माझ्या पत्नीला खर्चाच्या एखाद्या मोठ्या आंकड्याचा तपशील देतां आला नाहीं म्हणजे ती हा खर्च किरकोळ खातीं मांडून मोकळी होते. रेल्वेच्या अंदाजपत्रकांत मात्र असें करण्यांत येऊं नये. कारण, तेथें कोट्यवधी रुपयांचा प्रश्न असतो.

**सिमेंटच्या कारखान्यांतील कामगार**—भारत सरकार सिमेंटच्या कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनासंबंधीं एक त्रिपक्षात्मक बोर्ड नेमण्याचा विचार करीत आहे. सध्यां अशा प्रकारचीं दोन बोर्डें अस्तित्वांत आहेत; एक कापड गिरण्यांतील कामगारांच्या वेतनासंबंधींचें व दुसरें साखर कारखान्यांतील वेतनासंबंधींचें.

**अरबस्थान व भारत ह्यांच्यांतील व्यापार**—भारत व अरबस्थान ह्यांच्यांतील व्यापार वाढविण्याच्या शक्यतेचा अभ्यास करण्यासाठी अरबस्थान सरकारचें एक प्रतिनिधीमंडळ भारतांत येणार आहे. अरबस्थानांतून भारताला फक्त अशुद्ध तेल मिळतें. भारताकडून अरबस्थानला कापड, तागाचा माल व चहा ह्या पदार्थांची निर्यात होते.

**फिलॉसाफिकल काँग्रेसला देणगी**—सीलोन सरकारच्या सांस्कृतिक खात्यानें भारताच्या फिलॉसाफिकल काँग्रेसला १०,००० रुपयांची देणगी दिली आहे. काँग्रेसच्या वार्षिक परिषदेंत 'बुद्धवाद' ह्या विषयावर उत्कृष्ट व्याख्यान देणाऱ्याचा गौरव करण्यासाठी ह्या रकमेचा विनियोग करण्यांत यावा अशी सीलोन सरकारची इच्छा आहे.

**जपानकडून यंत्रसामुग्री घेणार**—जपाननें भारताला जें कर्ज दिलें आहे त्याचा उपयोग करून भारत जपानकडून दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम पुरा करण्यास लागणारी अनेक प्रकारची यंत्रसामुग्री घेणार आहे अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली जागतिक बँक ज्या दरानें व्याज आकारते त्याच दरानें कर्जावर व्याज देण्यांत येणार आहे.

**निर्वासितांना दिलेली मदत**—१९५७ सालच्या डिसेंबरच्या अखेरीपर्यंत २,४६,५६८ निर्वासितांना भारत सरकारनें नुकसानभरपाई दिली. नुकसान भरपाईचा आंकडा ७४ कोटी रु.च्या घरांत गेला आहे. चालू वर्षी आणखी ११,००० निर्वासितांना नुकसानभरपाई दिली जाईल.


# कूळ व शेतजमीन कायदा

( अद्यावत् दुरुस्त्यांसह )

ता. २६।२।१९५८ च्या 'अर्थ' च्या अंकांत अभिप्राय आलेले.

किं. रु. ४/–

पत्ता:—लॉ बुलेटिन, ७१० सदाशिव, पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. १२ मार्च, १९५८



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बेल्जमचें सहकार्य मिळविण्याच्या वाटाघाटी

भारत व बेल्जम ह्या उभयता देशांतील व्यापारी व औद्योगिक संबंध वाढविण्याच्या व दृढ करण्याच्या दृष्टीनें दोन्हीं देशांच्या प्रतिनिधींमध्यें वाटाघाटी चालू आहेत. बेल्जम हा देश भौगोलिक दृष्ट्या लहान असला तरी पश्चिम युरोपांतील इतर देशांप्रमाणें औद्योगिक दृष्ट्यां पुढारलेला आहे. ब्रुसेल्स येथील बेल्गो–इंडिअन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेच्या अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली बेल्जिअन व्यापाऱ्यांचें व उद्योगपतींचें एक मंडळ सध्यां भारताच्या दौऱ्यावर आहे. गेल्या कांहीं दिवसांत मंडळानें भारताच्या प्रमुख व्यापारी व औद्योगिक केंद्रांना भेटी दिल्या. भारत सरकारच्या व्यापार व औद्योगिक खात्यांशीं मंडळानें वाटाघाटी केल्या आहेत. मंडळाच्या नेत्यानें असा विश्वास व्यक्त केला आहे कीं, भारतामधील मंडळाच्या दौऱ्याचा अहवाल बेल्जममध्यें प्रसिद्ध झाल्यावर तेथील भांडवलादार व उद्योगपती ह्यांना भारताबद्दल अधिक आस्था वाटूं लागेल. भारताच्या व्यापार खात्याच्या प्रवक्त्यानें मंडळाला देशाचें औद्योगिक धोरण समजावून दिलें. भारतामधील उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्याची शक्यता, उधारीनें यंत्रसामुग्री मिळण्याची सोय आणि तांत्रिक ज्ञानाचें शिक्षण ह्या तीन बाबतींत भारताला बेल्जमच्या सहकार्याची आवश्यकता असल्याचें मंडळाला सांगण्यांत आलें. मंडळाचा दौरा भारतामधील चालू औद्योगिक व आर्थिक परिस्थितीचें निरीक्षण करण्यासाठी काढण्यांत आलेला होता. १९५६–५७ सालीं भारतानें बेल्जमला ६·८५ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात केलेला आहे. उलट पक्षीं, बेल्जमनें भारताला २४·५३ कोटी रुपयांचा माल निर्यात केलेला आहे.

---

## चीन व जपान ह्यांचा व्यापारी करार

चीन आणि जपान ह्या देशांनीं परस्परांत एक ऐनजिनसी देवघेवीचा व्यापारी करार केला आहे. चीनला आपलें औद्योगीकरण वेगानें करावयाचें असल्यामुळें मिळेल तेथून, मिळेल त्या प्रकारानें मदत घेण्याचें चीनच्या सरकारनें ठरविलेलें दिसतें. चीनचें औद्योगीकरण हा प्रश्नच एवढा अवाढव्य आहे कीं असें धोरण स्वीकारल्याखेरीज दुसरा मार्गच उरलेला नसावा. चीनचे मुख्य प्रधान श्री. चौ एन लाय ह्यांनीं असा अंदाज केला आहे कीं, सुमारें पंधरा वर्षांच्या अवधींत चीन लोखंड व पोलादाच्या उत्पादनांत ब्रिटनसारख्या प्रगत देशाच्याहि पुढें जाईल. पण, तरीसुद्धां लोकसंख्येच्या मानानें ही प्रगति अपुरीच ठरेल. श्री. चौ एन लाय ह्यांच्या वरील मतावरून चीनच्या औद्योगीकरणाच्या अवघडपणाची कल्पना येण्यासारखी आहे. पेकिंगच्या सरकारनें जपानशीं जो नवीन करार केला आहे, त्याप्रमाणें चीनच्या हैनान ह्या बेटांतील दगडी कोळसा व लोखंड जपानला पुरविण्यांत येणार आहे. त्यांचा वापर करून जपान चीनला एक कोटी पौंड किंमतीचें पोलाद पुरविणार आहे. पुढील पांच वर्षांच्या काळांत जपान व चीन ह्यांच्यामधील हा व्यापार चांगलाच फोफावणार अशीं लक्षणें दिसत आहेत. ह्या काळांत चीन जपानला १० कोटी पौंड किंमतीचा कच्चा माल पुरवील आणि त्याच्या बदला जपान चीनला तितक्याच किंमतीचें पोलाद पुरवील. दुसऱ्या महायुद्धापूर्वीपासून जपान व चीन एकमेकांचें राजकीय वैरी म्हणून नांदत आलेले आहेत. तरीसुद्धां त्यांना हा व्यापारी व्यवहार करावा लागला. कायम टिकणाऱ्या वस्तुस्थितीपुढें क्षणिक रागलोभ फार काळ टिकत नाहींत, असाच ह्याचा अर्थ आहे.

---

## देणग्यांवरील नवा कर

एका वर्षाच्या अवधींत देणगीदारानें दिलेल्या देणग्यांच्या एकूण रकमेवर हा कर आकारण्यांत येईल. परंतु या कराचा दर ठरविण्यासाठीं त्या मागील वर्षाच्या चार वर्षांत दिलेल्या देणग्यांची रक्कम एकत्रितपणें विचारांत घेण्यांत येईल. कोणत्याहि एका वर्षांत दिलेल्या एकूण १०,००० रुपयांपर्यंतच्या देणग्यांवर कर आकारण्यांत येणार नाहीं. परंतु देणग्यांची ही रक्कम वरील मर्यादेहून वाढल्यास त्या वाढीव रकमेवरच कर आकारण्यांत येईल. मात्र कोणत्याहि एका वर्षांत एका व्यक्तीस ३,००० रु. हून अधिक रु. देणगी देण्यांत आल्यास करमाफीची वर उल्लेखिलेली मूळ मर्यादा ५,००० रु. पर्यंत कमी करण्यांत येईल.

कर आकारण्यांत येणार नाहीं असे देणग्यांचे कांहीं प्रकार पुढील प्रमाणें आहेत.

(अ) मध्यवर्ति व राज्य सरकारें, स्थानिक संस्था व धर्मार्थ संस्था, यांस दिलेल्या देणग्या. (ब) विवाहसमयीं, अवलंबून असणाऱ्या स्त्रियांना, १०,००० रु. पर्यंत दिलेल्या देणग्या. (क) पत्नीला १ लाख रु. रकमेपर्यंत दिलेल्या देणग्या. (ड) अवलंबित व्यक्तींना प्रत्येकीं १०००० रु. रकमेपर्यंतच्या विमापत्रांच्या देणग्या.

कराचे दर : वारसा करावरील दरांप्रमाणेंच; मात्र ५०,००० रु. ची पहिली श्रेणी करमुक्त नाहीं. हे दर, पहिल्या श्रेणीस ४ टक्क्यांपासून ५० लाख रुपयांहून अधिक रकमेच्या देणग्यांच्या बाबतींत ४० टक्क्यांपर्यंत आहेत.

देणगीकरापासून ३ कोटी रु. उत्पन्न येण्याचा अंदाज आहे.

---

## वारसा कर कायद्यांत दुरुस्त्या

पुढील महत्त्वाचे बदल सुचविण्यांत आले आहेत.

(अ) करमाफीची मर्यादा १ लक्ष रुपयांवरून कमी करून ५० हजार रुपये करण्यांत येईल.

(ब) सध्यां वारसा कराच्या रकमेंतून वारसा दाखल्यासाठीं भराव्या लागणाऱ्या प्रोबेट कराची वा कोर्ट फीची संपूर्ण रक्कम कमी करण्यांत येते, त्याऐवजीं फक्त निम्मी रक्कमच कमी केली जाईल.

या बदलांमुळें उत्पन्नांत ५० लक्ष रुपयांनीं वाढ होईल व तें सर्व राज्यांना मिळेल.

### भोर स्टेट बँक लिमिटेड, भोर

३१, डिसेंबर १९५७ अखेरच्या व्यवहारांत बँकेस निव्वळ नफा रु. ७,९०४-९३ झाला आहे. यामध्यें मागील सालचा शिल्लक राहिलेला नफा रु. १५३-७३ नये पैसे मिळविता एकूण नफा रु. ८,०५८-६६ नये पैसे पुढीलप्रमाणें वाटावा अशी संचालक मंडळाची शिफारस आहे. बोर्डानें चालू सालीं भागावरील फायदा न वांटण्याचें ठरविलें आहे,

| | |
|---|---|
| ( १ ) रिझर्व्ह फंडाकरतां तरतूद | १,६००-०० |
| ( २ ) इन्कमटॅक्सकरतां तरतूद | ३,३००-०० |
| ( ३ ) बुडीत व संशयीत कर्जाकरतां तरतूद | ३,०००-०० |
| ( ४ ) पुढील सालीं शिलकी नफा ओढणें | १५८-६६ |
| एकूण | रु. ८,०५८-६६ |

भोर येथील बँकेच्या इमारतीमध्यें सेफ-डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडीचे सोईचा स्थानिक खातेदार चांगला उपयोग करून घेत आहेत. गोडाउनची जी सोय केली आहे, तिचाहि स्थानिक व्यापारी व खातेदार यांनीं शक्य तितका उपयोग करून घ्यावा.

आर्थिक टंचाईच्या सध्यांच्या आणिबाणीच्या काळांत लहान लहान बँकांना विशेषप्रकारें समाधानकारक उन्नति करून घेण्यास फारसा वाव नसल्यामुळें कांहीं भागीदारांचा कानोसा घेऊन डायरेक्टरबोर्डानें बँकेचें स्टेट बँक ऑफ इंडिआमध्यें विलीनीकरण करणेबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ यांजकडे पत्रव्यवहार केला आहे व त्याप्रमाणें स्टेट बँक ऑफ इंडिआ ह्या बँकेनें बँकेची इन्स्पेक्शनहि केली आहे व त्याचा समाधानकारक रिपोर्ट लवकरच येईल अशी आशा आहे. योग्य वेळीं योग्यप्रकारें भागीदारांपुढें या गोष्टी मांडण्यांत येतीलच.

### दि भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

अहवालाचे सालीं बँकेचे व्यवहारांत निव्वळ नफा रु. २२,४६७·२३ झाल्याचे दिसून येईल. शिलकी नफा धरून एकूण रक्कम रु. २५,११४·०३ ही विभागणीसाठी उपलब्ध होती. या रकमेची वांटणी खालील प्रमाणें करावी अशी संचालकांची शिफारस आहे.

| | |
|---|---|
| रिझर्व्ह फंड | रु. ६,००० ०० |
| कर्जरोख्यांवरील घसारा फंडासाठी | रु. २,००० ०० |
| ६% क्यु. प्रे. शेअर्सवर डिव्हिडंड देण्यासाठी | रु. १,२२५ ०० |
| शिल्लक पुढील वर्षासाठी ( त्यांतून कर भरावयाचा ) | रु. १५,८८९ ०३ |
| | रु. २५,११४ ०३ |

बँकेकडे असणाऱ्या ठेवीमध्यें तीन लाख रुपयांचे वर वाढ झाली. बँकेच्या शाखांचे कामकाजहि समाधानकारक होत आहे.

अहवालाचे सालीं बँकेच्या इमारतीवर जो घसारा काढण्यांत आला तो बँकेने इमारतीची किंमत भागिले इमारतीची अपेक्षित आयुर्मर्यादेची वर्षे याप्रमाणें काढण्यांत आला. या बाबत माननीय संचालक मंडळानें इमारतीची सद्यःपरिस्थिति, चार्टर्ड आर्किटेक्टस यांनीं दिलेल्या आयुर्मर्यादेचें सर्टिफिकेट व तसेंच आतांपर्यंत काढण्यांत आलेला घसारा या सर्वांचा विचार केला. आजपर्यंत ज्या पद्धतीनें इमारतीवरील घसारा ( एका विवक्षित टक्कयानें पुढें ओढलेल्या किंमतीवर ) आकारला जात होता, त्या पद्धतीनें जर १९५७ सालाकरतां आकारला असतां तर बँकेस रु. १२,४७० ची तरतूद करावी लागली असती व त्यामुळें बँकेच्या नफ्यांत रु. ५,१२३ चा फरक पडला असता.

### शंभर रुपयांच्या नोटांची नोंदणी ठेवण्याची पद्धत बंद करण्याचीं कारणें

शंभर रुपयांच्या चलनी नोटांची नोंदणी करण्याची पद्धत १ जुलै १९५६ पासून बंद करण्यांत आली आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत व नंतर या नोटांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आणि रिझर्व्ह बँकेला मोठा खर्च केल्याशिवाय त्यांचा हिशोब ठेवणें वा त्या रद्द करण्याचें काम अशक्य झालें. फारच थोडे लोक या नोटांचे क्रमांक लिहून ठेवीत. त्यामुळें या क्रमांकाच्या आधारें हरविलेल्या, नष्ट झालेल्या वा फाटलेल्या नोटांचे पैसे घेण्याच्या सोयीचा लाभ त्यामानानें फारच थोडे लोक करून घेऊं शकत. शिवाय पैसे घेण्याची ही पद्धत अतिशय त्रासदायक, कंटाळवाणी व खर्चिक असल्याची सर्वसाधारण लोकांची तक्रार होती.

### तूट भरून काढण्यासाठी चलनवाढीची मदत

"कराच्या आणि खर्चाच्या चालू पातळीवरून पाहता महसुलांत ३३ कोटी रुपयांची तूट येईल. भांडवली खर्च ४१२ कोटी रु. येईल. राज्य सरकारांना व इतरांना कर्जें देण्याकरतां ३६२ कोटी रु. आणि कर्जें परत करण्यासाठी २८ कोटी रु. ठेवले आहेत. राज्य सरकारें व इतर यांच्याकडून कर्जाच्या परतफेडीचे येणारे ७५ कोटी रुपये, भारतांत बाजारांत कर्जें उभारून मिळणारे १४५ कोटी रुपये, अल्प बचतींतून येणारे १०० कोटी रु., परकीयांकडून कर्जापोटीं मिळणारें २८५ कोटी रु., आणि कर्ज व ठेवी या खात्यांखालीं मिळणारें किरकोळ उत्पन्न २५ कोटी रु. यांतून हा एकूण ८३५ कोटी रु. चा खर्च भागविण्यांत येईल. तरीहि २०५ कोटी रुपयांची राहणारी तूट ट्रेझरी बिलें काढून भरून काढण्यांत येईल."

— अर्थमंत्र्यांचें बजेटाच्या वेळचें भाषण.

### जगजीवन राम ह्या नांवावर कोटी

रेल्वेखात्याच्या बजेटावरील चर्चेच्या वेळीं पार्लमेंटांत श्री. अटलबिहारी वाजपेयी ( जनसंघ ) ह्या सभासदानें रेल्वेमंत्री श्री. जगजीवन राम ह्यांचे नांवावर गमतीदार कोटी केली. श्री. वाजपेयी म्हणाले, "रेल्वेवर आतां अपघात फारच वाढले आहेत. रेल्वेतिकीट विकत घेतांना नेहमीं भीति वाटते, कीं 'जग' व 'जीवन' ह्यांना रामराम ठोकावा लागणार ! सहाजीकच, प्रवासांत ओठावर 'राम'नाम शिल्लक रहातें.

### साखरेच्या उत्पादनांत १·९% वाढ

निर्वात काहिल्यांचा उपयोग करणाऱ्या साखरकारखान्यांत चालू हंगामांत २०·६७ लाख टन उत्पादन झाल्याचा मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्याच्या अर्थ आणि आंकडेवारी विभागाचा अंदाज आहे. मागील हंगामांतील हा आंकडा २०,२९ लाख टन होता. यावरून गतवर्षीशीं तुलना करतां यंदा उत्पादनांत ३८,००० टन अथवा १·९ टक्के वाढ झाल्याचें दिसून येतें.

साखरेच्या उत्पादनांतील ही वाढ मुख्यतः मुंबई ( ६९,००० टन ), पंजाब ( २४,००० टन ) व म्हैसूर ( ३१,००० टन ) राज्यांत झाली आहे. उत्तर प्रदेश व बिहार या राज्यांच्या उत्पादनांत मात्र घट झाली.

## भारतीय लोखंड व पोलाद-धंद्याचा विकास

( लेखक :—श्री. द. वा. ओक, व्याख्याता, लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें २. )

### उद्योग महर्षि टाटांची दूरदृष्टि

पोलाद निर्मितींत अग्रगण्य असणाऱ्या जमशेटपूर येथील कारखान्याचा सुवर्ण महोत्सव लवकरच साजरा होत आहे. याचें सर्व श्रेय अर्थातच उद्योगमहर्षी श्री. जमशेटजी टाटा यांनाच आहे. जर लोखंड व पोलादाची निर्मिति स्वदेशांतच झाली नाहीं तर कुठलाहि देश औद्योगिक दृष्ट्या संपन्न होणार नाहीं हें त्यांनीं अचुक ओळखलें, व त्याच दृष्टीनें कुठल्याहि प्रकारें पाठबळ नसतांना केवळ स्वतःच्या अलौकिक हिंमतीवर या कारखान्याची साकची या ठिकाणीं मूहर्तमेढ रोवली व आज त्याचा टाटानगर म्हणून प्रचंड विस्तार झालेला आपणांस दिसत आहे.

### पोलाद निर्मिती – भारतीय पुरातन व्यवसाय

भारताचें जुनें वैभव परकीय सत्तेचे काळांत नष्ट होऊन तो औद्योगिक प्रगतींत मागें पडला. वास्तविक पाहतां एक काळ असा होता कीं, ज्यावेळीं भारत पोलाद निर्मितींत जगांत अग्रेसर होता. २३ फूट उंचीचा व ६ टन वजनाचा पोलादाचा स्तंभ शतकानुशतकें नैसर्गिक प्रहार सहन करून आजहि दिल्लीमध्यें दिमाखानें उभा आहे. यावर थोडासुद्धां गंज चढलेला नाहीं. याचें शास्त्रज्ञांना अजूनहि कुतुहल वाटतें. तसेंच, विजापूरची मुलुखमैदान तोफ त्यावेळीं कशी ओतली असेल याचेंहि त्यांना कोडें आहे. भारतांतील दुमास्कची पोलादाचीं बनविलेलीं शस्त्रांचीं पातीं आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत मुद्दाम ठेवण्यांत येत.

### कारखान्यांची उभारणी

विसाव्या शतकाचे सुरवातीपासून "कुलटी" या ठिकाणीं बेंगाल आयर्न अँड स्टील कंपनी कच्चें लोखंड मोठ्या प्रमाणावर तयार करत असे. परंतु टाटा आयर्न अँड स्टील कं. चालू होईपर्यंत व्यापारी दृष्ट्या पोलादाचें उत्पादन होत नसे. कारण यामध्यें अनेक अडचणी असतात. प्रथमतः विपुल प्रमाणांत खनिज लोखंड व दगडी कोळसा एकत्र मिळणें आवश्यक असतें. तसेंच यांचे शेजारीं पाण्याचा मुबलक पुरवठा असणेंहि जरूर आहे. या परिस्थितीचा श्री. जमशेटजी टाटांनीं सखोल अभ्यास केला होता. त्यांचे पुढें मुख्य प्रश्न होता तो कारखान्यासाठी लागणाऱ्या मोठ्या भांडवलाचा. कारण, ब्रिटिश राज्यकर्त्यांचे हितसंबंध लक्षांत घेतां परकीय भांडवल मिळणें शक्यच नव्हतें. याच सुमाराम १९०७ ची स्वदेशी चळवळ चालू झाली व त्यामुळें सर्व जनतेचें लक्ष टाटांच्या ह्या योजनेकडे वळलें. निःस्वार्थ बुद्धीनें व स्वदेशीचे प्रेमानें प्रेरित होऊन केवळ ३ आठवड्यांचे आंत दोन कोट, वीस लक्ष रुपयांची रकम गोळा झाली व १९०८ सालीं कारखाना उभारणीस सुरवात झाली. सुवर्णमहोत्सवाचा टप्पा गाठणाऱ्या या कारखान्याचा प्रत्येक भारतीय नागरीकास अभिमान वाटेल.

१९१३–१४ मध्यें या कारखान्यांतून ४,९०० टन पोलाद निर्माण झालें. पहिल्या महायुद्धांत ब्रिटिश सरकारला या कारखान्यांतून ३,००,००० टन पोलाद पुरविलें. नंतर १९३८ सालीं हिरापूर येथें इंडियन आयर्न अँड स्टील कंपनी स्थापन झाली. दरवर्षी येथून ३,६०,००० टन कच्चें लोखंड तयार होई व त्यांतील बहुतेक परदेशींच रवाना होई. १९२३ मध्यें म्हैसूर सरकारनें कोळशाचा उपयोग करणाऱ्या लोखंड गाळण्याची भट्टी स्थापन केली. त्यांतून ८६,००० टन कच्चें लोखंड तयार होऊं लागलें. १९३५ पर्यंत फक्त जमशेटपूर येथेंच पोलाद निर्मिति होत असे. परंतु नंतर भद्रावती येथील विद्युत् भट्टी पूर्ण झाल्यामुळें या ठिकाणीं सुद्धां वार्षिक ३०,००० टन पोलाद तयार होऊं लागलें. दुसऱ्या महायुद्धामुळें या धंद्याचे वाढीस चांगलेंच प्रोत्साहन मिळालें. या काळांत नवीन वस्तूंची व नवीन प्रकारच्या पोलादाची जमशेटपूर येथें निर्मिति होऊं लागली. त्यामुळें रेल्वेचीं चाकें, धांवा, वगैरे साहित्य तयार करण्यांत येऊन मशिन टूल्सकरतां योग्य असें पोलादहि बनविण्यांत येऊं लागलें. जमशेटपूर येथील कारखान्यानें युद्धोपयोगी साहित्याच्या निर्मितींत विशेषच प्रगति केली.

### प्रगतीच्या योजना

भारतांत एकूण १७,००,००० टन पोलाद खालील दर्शविल्याप्रमाणें तयार होतें :—

| | |
|---|---|
| टाटा आयर्न अँड स्टील कं. | १०,७०,००० टन |
| इंडियन आयर्न अँड स्टील कं. | ५,२५,००० टन |
| म्हैसूर आयर्न अँड स्टील वर्क्स | ३५,००० टन |
| इतर | ७०,००० टन |
| एकूण | १७,००,००० टन |

भारतांतून प्रतिवर्षी १२ लक्ष टनांहून अधिक वजनाचें, ५ कोटी रु. किंमतीचे लोह-खनिज निर्यात होतें. उलट, परदेशांतून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत जवळ जवळ ५० लक्ष टन पोलाद व १५० लक्ष टन सिमेंट आयात करावें लागल्यामुळें ६०० कोटी रुपये परदेशीं जाणार आहेत. जागतिक २७० दश लक्ष टन उत्पादन व एकूण आपल्या देशाचा एकंदर विस्तार पाहतां वरील उत्पादन फारच तोकडें आहे. वास्तविक भारतांतील बिहार व अन्य ठिकाणीं उच्च प्रतीच्या लोखंड खनिजांचे सांठे आहेत व त्याचप्रमाणें कोळसा व मँगनीज यांच्या सांठ्यांचीहि कमतरता नाहीं. त्यामुळें ह्या नैसर्गिक संपत्तीचा योग्य उपयोग केला गेल्यास जगांतील पोलाद निर्मितींत भारतास वरचा क्रमांक मिळेल. खाजगी व सरकारी योजनांची त्याच दृष्टीनें आखणी चालू आहे. १३,००,००० टनांपासून २०,००,००० टन पोलादापर्यंत उत्पादन वाढविण्याची टाटा आयर्न अँड स्टील कंपनीनें दोन दशलक्ष टनांची योजना म्हणून प्रसिद्ध असलेला कार्यक्रम हातीं घेतला आहे. याकरतां जागतिक बँकेकडून ३६ कोटी रुपयांचें कर्जहि त्यांनीं मिळविलें आहे. त्याचप्रमाणें १९५३ मध्यें स्टील कॉर्पोरेशन ऑफ बेंगाल ही कंपनी ज्या कंपनींत सामील झाली त्या इंडियन आयर्न अँड स्टील कंपनीनें आपली कार्यक्षमता वाढविण्याच्या योजना आंखल्या आहेत. त्यामुळें ८,००,००० टनापर्यंत पोलादाचें उत्पादन वाढेल. याकरतां या कंपनीला १८ कोटी रु. भारत सरकारकडून व २५ कोटी रु. जागतिक बँकेकडून कर्ज मिळालें आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत एकूण ६ दशलक्ष टन पोलादनिर्मितीचें उद्दिष्ट ठरवलें आहे. दोन लक्ष टन पोलाद टाटा कंपनी व एक दशलक्ष इंडियन आयर्न स्टील कंपनी उत्पादन करील. उरलेला वाटा भारत सरकारच्या मालकीच्या नवीन सुरू झालेल्या कारखान्यांत तयार होईल.

### सरकारी कारखाने

ओरिसा प्रांतांत रुरकेला या ठिकाणीं पहिला कारखाना चालू होणार असून याकरतां लागणारें खनीज लोखंड तलधीह या जवळच ६० मैलांवर असलेल्या खाणींतून व कोळसा

हा बोकारो–कर्गली व झरीया या ठिकाणांहून पुरवला जाईल. हिराकुड येथील विद्युत्-निर्मिति केंद्रांतून या कारखान्यासाठी विजेचा पुरवठा केला जाईल. व (L–D) एल्. डी. पद्धत या विशिष्ट नांवानें ओळखल्या जाणाऱ्या पद्धतीनें भारतांत प्रथमच पोलाद-निर्मिति हें या कारखान्याचें वैशिष्ट्य होय.

दुसरा पोलाद निर्मितीचा कारखाना मध्य प्रदेशांत भिलाई येथें चालू होणार असून त्याकरतां लागणारें लोह खनिज डाली-राजर्हा येथून व कोळसा हा बोकॅरो–कर्गली व झरिया येथील खाणींमधून पुरवला जाईल. हा कारखाना भारत सरकार व रशिया यांच्या सहकार्यानें बांधला जात आहे. या कारखान्यांतून मुख्यतः रेल्वे रूळ व विविध बांधणीकरतां पोलाद यांचेंच उत्पादन होईल.

तिसरा कारखाना कलकत्त्यापासून ११० मैलांवर दुर्गापूर या ठिकाणीं ब्रिटिश कारखानदारांचे सहकार्यानें बांधला जात आहे. याकरतां लागणारें लोह खनिज गॉया ठिकाणाहून व कोळसा झरिया येथील खाणींमधून पुरवला जाईल. या कारखान्यांतून मुख्यतः घरांचे बांधणी करतां लागणारें पोलाद तसेंच रेल्वे डब्यांची चाकें, धांवा, याकरतां पोलाद-निर्मिति होईल.

या तीनहि कारखान्यांचे पूर्ततेसाठीं ४०० कोटी रु. पेक्षा जास्त खर्च येणार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ६ दशलक्ष टन पोलाद-निर्मिति या आपल्या उद्देशामध्यें कुशल तंत्रज्ञांची वाण, कोळशाचा अपुरा पुरवठा, इत्यादि ज्ञात व अज्ञात अशा अनेक अडचणींत उद्भवणार आहेतच. त्यांना तोंड देण्यासाठीं हिंदी विद्यार्थी परदेशीं पाठविण्यास आले असून कोळशाचें उत्पादन वाढविण्याचा कार्यक्रमहि हातीं घेण्यांत आला आहे.

### उज्ज्वल भवितव्य

पोलाद निर्मितीमध्यें अनंत अडचणी असल्या तरी भारताचें या धंद्यांतील भवितव्य उज्ज्वल आहे अशी जागतिक कीर्तीच्या शास्त्रज्ञांची सुद्धां खात्री आहे व योग्य रीतीनें सुरळीत निर्मिति होत गेल्यास भारतांत उच्च प्रतीचें पोलाद अगदीं स्वस्त किंमतींत तयार होऊं शकेल असाहि त्यांचा भरवसा आहे. जगामध्यें एकंदर २७० दशलक्ष टनाचें वर पोलादनिर्मिति होते. त्यांत अमेरिका १०५ दशलक्ष टन, रशिया ४५ दशलक्ष टन, फ्रान्स १२ दक्षलक्ष टन, व जपान जवळ जवळ १० दशलक्ष टन पोलाद तयार करतात. या सर्व औद्योगिक विकासित देशांचे मालिकेंत वरच्या क्रमांकांत भारत लवकर जाऊन बसेल यांत संदेह बाळगण्याचें कांहींच कारण नाहीं.

### ठेवी वाढल्या, म्हणून नवे शेअर्स विक्रीला काढले

दि युनियन बँक ऑफ इंडिया लि. नें २० लक्ष रुपयांचे नवे शेअर्स विक्रीस काढून वसूल भांडवल ४० लक्ष रु. चें ६० लक्ष रु. करण्याचें ठरविलें आहे. १९५६ अखेर बँकेकडे १३ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या, त्या १९५७ अखेर २० कोटी रुपयांवर गेल्या. त्यामुळें ठेवींशीं भांडवलाचें व गंगाजळीचें प्रमाण ४% वर उतरलें. हें प्रमाण सुधारण्यासाठीं वसूल भांडवल वाढविणें भाग पडलें आहे. युनियन बँकेचा प्रत्येक शेअर ५ रुपयांचा असून सर्व रक्कम भरणा झालेली आहे.

### कंपनी कायदा कारभार खात्यानें भरलेले खटले

१ एप्रिल, १९५६ ते ३१ मार्च, १९५७ पर्यंत कंपनी कायदा कारभारखात्यानें ५७२ जणांवर व १ एप्रिल, १९५७ ते ३१ डिसेंबर, १९५७ पर्यंत ७०० जणांवर खटले भरले.

## तुमचें स्थान कोणतें ?

[ लेखक :—श्री. वा. काळे, संपादक: 'अर्थ,' दुर्गाधिवास, ८२३ शिवाजीनगर, पुणें ४. ]

'कण आणि क्षण' व 'पुढें पाऊल' अशीं दोन पुस्तकें लिहून श्री. काळे यांनीं मराठी वाङ्मयाच्या ललित विभागांत एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलें आहे यांत शंका नाहीं. आणि म्हणूनच ते आतां वाचकांना विचारीत आहेत, 'तुमचें स्थान कोणतें ?' आपल्या कुटुंबांत व सभोंवतालच्या सामाजिक जीवनांत मनुष्य कोणत्या प्रकारें वागतो त्यावर त्याचें यशापयश व सुखदुःख अवलंबून असतें. त्याचें जीवन यशस्वी व सुखी कसें होऊं शकेल, यासंबंधीं प्रस्तुत पुस्तकांत अनेक प्रकारच्या छोट्या-मोठ्या मार्गदर्शक सूचना करण्यांत आल्या आहेत. तात्त्विक विषय मनोरंजक उदाहरणांच्या द्वारां व केवळ व्यावहारिक दृष्टि ठेवून वाचकांना पटेल व पचेल असा सुबोध करून कसा दाखवावा, या बाबतींत श्री. काळे यांचा हातखंडा आहे. पाहुणे, वेळ, मैत्री, प्रतिष्ठा, परस्पर संमतीनें विवाह, सुशिक्षित स्त्रिया व त्यांचे संसार, वगैरे विविध विषयांवर लिहिलेले १९ लघुनिबंध या पुस्तकांत संकलित केले आहेत. या लेखांवरून लेखकाचें मार्मिक निरीक्षण जसें दिसून येतें, त्याचप्रमाणें त्याचा व्यासंगहि प्रत्ययास येतो. आंखूड खराटा, दांडीवरचें धुणें, असले क्षुल्लक विषयहि लेखकानें चित्तवेधक केले आहेत. कांहीं लेख अधिक तात्त्विक म्हणून रसापकर्षक वाटले तरी संग्रह एकंदरीनें रम्य व बोधकारक आहे. पृ. १२०. किं. २ रु.

— चित्रमयजगत्, मार्च, १९५८

### मेहकर लँड मॉर्गेज बँकेचा रौप्यमहोत्सव व सहकारी परिषद्

मेहकर येथें, मेहकर लँड मॉर्गेज बँकेचा रौप्य महोत्सव ता. १८–३–५८ रोजीं दोनप्रहरीं ४ वाजतां व ता. १९–३–५८ रोजीं सहकारी परिषद सकाळीं ८॥ वाजतां प्रो. कर्वे, डायरेक्टर रिझर्व बँक व मेंबर प्लॅनिंग कमिशन यांच्या अध्यक्षतेखालीं व्हावयाच्या आहेत. या परिषदेंत खालील विषयांची चर्चा होईल.

(१) विदर्भ बँकेचें मुंबई प्रांतिक बँकेमध्यें सामिलीकरण.

(२) को. इन्स्टिटयूटचे मुंबईचे मध्यवर्ती इन्स्टिटयूटमध्यें सामिलीकरण.

(३) वऱ्हाडांतील तालुका बँकांचें भवितव्य.

(४) गहाणी बँकांचे भवितव्य.

(५) सरकारी शेअर्स घेणाऱ्या बँकांवर जे नवीन निर्बंध येत आहेत त्याबद्दल व इतर महत्त्वाचे प्रश्न.

### श्री. द. वि. केळकर ह्यांना १५,००० रु. ची थैली

मुंबईच्या महाराष्ट्र चेंबरचे सेवानिवृत्त सेक्रेटरी श्री. द. वि. केळकर यांना निरोप देण्याचा समारंभ दि. ५ रोजीं झाला. त्यांना चेंबरतर्फे रु. १५,००० (पंधरा हजार) ची थैली देण्यांत आली. पाव शतकाहून अधिक काळ श्री. केळकर यांनीं चेंबरची सेवा केली, त्याचा यथोचित गौरव करण्यांत आला. चेंबरतर्फे आठवण म्हणून त्यांना भेट देण्यांत आली.

### रशियाला पाठवलेले बूट

स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें रशियाला बुटांच्या ९ लक्ष जोड्या विकल्या. त्यांपैकीं १,०२४ जोड्या नापसंत होऊन परत आल्या. ४३,०८२ जोड्या सदोष आढळल्या, त्यांना कमी किंमत आली.

## सन १९५७–५८ मधील सहकारी विकासाचा कार्यक्रम

चालू आर्थिक वर्षांत २,९२५ मोठ्या व २,००० छोट्या सहकारी संस्था नव्यानें स्थापन झालेल्या अथवा अधिक भक्कम पायावर उभारलेल्या असतील असें सहकारी विकासाच्या पुनर्विलोकनावरून दिसून येतें. याशिवाय ४७९ मार्केटिंग व २६ प्रोसेसिंग सोसायट्याहि असतील. मोठ्या आणि मार्केटिंग सोसायट्यांकडून ३१ मार्च १९५८ पर्यंत अनुक्रमें १,०५२ व ३९८ गुदामें बांधण्यांत येतील. राष्ट्रीय सहकारी विकास आणि गुदाम मंडळाच्या फेब्रुवारींत झालेल्या बैठकींत ही माहिती सांगण्यांत आली. पतपेढ्या, मार्केटिंग व प्रोसेसिंग सोसायट्या, सहकारी शेती-संस्था याकरितां आणि सेंट्रल वेअरहाउसिंग कॉर्पोरेशन व राज्यांचीं कॉर्पोरेशनें यांच्या भाग भांडवलासाठी गुंतवावयाचे पैसे मिळून १९५७–५८ मध्यें एकूण ७०० लक्ष रुपये खर्च येईल असा अंदाज असून त्यांतील मध्यवर्ती सरकारचा वांटा ३८१·९४ लक्ष रुपये आहे. बाकीचे पैसे राज्य सरकारें देतील.

### १९५६–५७ मधील प्रगति

सन १९५६–५७ मध्यें सदर मंडळानें घेतलेल्या प्रमुख निर्णयांत खतांच्या वांटपाची कामगिरी हळूहळू सहकारी संस्थांकडे सोंपविण्याबाबतच्या निर्णयाचा अंतर्भाव होतो. १९५६–५७ मध्यें १२७० मोठ्या सहकारी संस्था स्थापन करण्याचा संकल्प होता, परंतु प्रत्यक्षांत १२४९ संस्थांची स्थापना झाली. सदर वर्षांत १८८ को–ऑपरेटिव्ह अपेक्स लॅण्ड मॉर्टगेज बँका संघटित वा पुनर्घटित करण्यांत आल्या. तसेंच सात अपेक्स मार्केटिंग संस्थांस, २२ प्रोसेसिंग संस्थांस, २४४ प्राथमिक व जिल्हा संस्थांस मंडळानें मदत केली. याशिवाय ९ नव्या सहकारी साखर कारखान्यांस मदत करण्यांत आली.

सन १९५६–५७ मध्यें ३७६ मोठ्या आणि २१८ मार्केटिंग संस्थांनीं शेतमालाच्या सांठवणीकरतां गुदामांच्या बांधकामास प्रारंभ केला. सदर मंडळानें या कामासाठी ३९·१२ लक्ष रुपये कर्जाऊ व ८·६० लक्ष रुपये मदत म्हणून मंजूर केले. त्याचप्रमाणें सहकारी शिक्षणासाठी १९५६–५७ मध्यें राज्यांना व संघटनांना २१,१२,१२२ रुपये मंजूर केले होते असेंहि या बैठकींत सांगण्यांत आलें. आठ ठिकाणीं ५४० गट पातळीवरील सहकारी अधिकाऱ्यांसाठी शिक्षणाची सोय करण्यांत आली. ३५०० कनिष्ठ नोकरांनाहि ४१ शाळांतून शिक्षण देण्यांत आलें.

---

**जगांतील लोकांची मोजदाद**—संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेतर्फे १९५५ ते १९६४ ह्या काळांतील जगाच्या लोकसंख्येची मोजदाद होणार आहे. आशिआंतील देशांनीं शिरगणतींत भाग घ्यावा म्हणून फोर्ड फौंडेशन ह्या संस्थेनें ३ लाख डॉलर्स त्यांना देण्याचें ठरविलें आहे. १४७ देश शिरगणतींत भाग घेतील.

**रामायणांतील प्रसंगावर बाहुल्यांचा बोलपट**—रामायणांतील कांहीं प्रसंग बाहुल्यांच्या द्वारां दाखविणारा एक चित्रपट भारत व झेकोस्लोव्हाकिआ सहकार्यानें तयार करणार आहेत. चित्रपट झेकोस्लोव्हाकिआंत तयार होणार असल्यानें कांहीं भारतीय कलाकारांना प्राग येथें जावें लागेल. तो तयार होण्यास वर्षभर लागेल.

## भारतीय मध्यवर्ती कापूस समितीची बैठक

गेलीं दोन वर्षें ही समिति राज्यांना मार्गदर्शन करीत असून, कापूस उत्पादन कार्यांत सुधारणा करण्यासाठी तिनें अनेक सूचना केलेल्या आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १९५७–५८ साठी ५४ लक्ष गांसड्या कापसाचें उत्पादन करण्याचें लक्ष्य ठरविण्यांत आलें असून, सदर वर्षांत सुमारें ५२ लक्ष गांसड्या कापूस पिकेल असा अंदाज आहे. १९५६–५७ मधील ५०·८ लक्ष गांसड्यांच्या उत्पादनाशीं तुलना करतां याबाबतींत प्रगति केल्याचें दिसून येईल. तथापि अद्यापहि २ लक्ष गांसड्यांची तूट बाकी आहेत.

कापूस उत्पादन वाढीसाठी लागवडीच्या क्षेत्रांत वाढ, सुधारलेल्या बियाण्यांचा वापर, खतें व रासायनिक खतांचा उपयोग, वनस्पति-संरक्षण उपायांचा अवलंब, पाणीपुरवठ्याची तरतूद आणि सुधारलेल्या शेतकी पद्धतींचा अवलंब, यासारखे उपाय चालू आहेत. लागवडीच्या क्षेत्रांत एकूण ४,६४,००० एकरांनीं वाढ करण्याचा संकल्प होता. परंतु प्रत्यक्षांत ३,७७,००० एकरांची वाढ झाल्याचें समजतें.

### सुधारलेल्या बियाण्यांचा वापर

मुंबई राज्याच्या मराठवाडा आणि विदर्भ विभागांत सुधारलेल्या बियाण्यांच्या वांटपाची व्यवस्था समाधानकारक झाली नाहीं. मराठवाड्यांत या वांटपाचें लक्ष्य २,५२,००० मण ठरविण्यांत आलें होतें, तर प्रत्यक्षांत ४६,३८७ मण बियाण्यांचें वांटप झालें. विदर्भासाठीं हेंच लक्ष्य १,६७,३२० मणांचें ठरविलेलें होतें. प्रत्यक्षांत अवघें ३७,६७० मण बियाण्यांचें वांटप झालें.

---

### हायकोर्ट जज्जांच्या जादा २८ जागा

वेगवेगळ्या राज्यांच्या हायकोर्टांतील तुंबलेलीं कामें संपविण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें हायकोर्ट जज्जांच्या जादा २८ जागा तात्पुरत्या काळापुरत्या मंजूर केल्या आहेत. त्यांचा तपशील असा:—

| हायकोर्ट | जागा | मुदत (वर्ष) |
|---|---|---|
| अलाहाबाद | २ | २ |
| आंध्रप्रदेश | ३ | २ |
| मुंबई | ४ | १९५९ अखेर |
| कलकत्ता | ४ | २ |
| मध्यप्रदेश | २ | २ |
| मद्रास | २ | २ |
| म्हैसूर | १ | मार्च, १९५८ अखेर |
| ओरिसा | १ | २ |
| पाटणा | ४ | २ |
| पंजाब | ४ | २ |
| राजस्थान | १ | २ |

---

### रेल्वे नोकरांची मारहाण वांचविण्यासाठीं!

"मेल आणि एक्सप्रेस आगगाड्यांना थांबवून ठेवून पॅसेंजर व मालगाड्यांना आधीं कां जाऊं दिलें जातें?" ह्या प्रश्नाला पार्लमेंटांत उत्तर देतांना रेल्वे खात्याच्या मंत्र्यांनीं सांगितलें, "कलकत्ता विभागांतच असें मुख्यत: घडतें. मेल व एक्सप्रेस गाड्यांना जाऊं देण्यासाठी लोकल गाड्यांचा खोळंबा झाला, तर त्यांतील उतारू रेल्वे नोकरांना मारहाण करतात."

### नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतच्या केंद्र सरकारच्या १९५६ मधील नियमानुसार

### (क्र. ८) अर्थ संबंधींचें प्रकटन

| | |
|---|---|
| (१) प्रकाशनस्थळ | ८२३, शिवाजीनगर, पुणें ४. |
| (२) नियतकालिकाचें स्वरूप | दर बुधवारीं प्रसिद्ध होणारें साप्ताहिक. |
| (३) मुद्रकाचें नांव | केशव गणेश शारंगपाणी<br>राष्ट्रीयत्व : भारतीय<br>पत्ता : ९१५/१, शिवाजीनगर, पुणें ४. |
| (४) प्रकाशकाचें नांव | श्रीपाद वामन काळे<br>राष्ट्रीयत्व : भारतीय<br>पत्ता : ८२३ शिवाजीनगर, पुणें ४ |
| (५) संपादकाचें नांव | श्रीपाद वामन काळे<br>राष्ट्रीयत्व : भारतीय<br>पत्ता : ८२३ शिवाजीनगर, पुणें ४ |
| (६) नियतकालिकाचे मालक, भागीदार, शेअरहोल्डर्स, इत्यादींचीं नांवें व पत्ते. | श्रीपाद वामन काळे<br>८२३, शिवाजीनगर, पुणें ४ |

मी श्रीपाद वामन काळे, असें प्रकट करतों कीं, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणें खरा आहे.

दि. १।३।१९५८ श्री. वा. काळे

### दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

वरील बँकेला १९५७ मध्यें, गेल्या वर्षातील २७८ रु. शिलकी नफा धरून, एकूण १,३३,२७५ रु. नफा झाला. करासाठी ६०,००० रु. ची तरतूद करून, नफा वाटणीस ७३,२७५ रु. उरतात. वाटणी खालीलप्रमाणें करावी, अशी डायरेक्टरांची शिफारस आहेः—

| | रु. |
|---|---|
| (१) स्टॅच्युटरी रिझर्व्ह | २८,००० |
| (२) ५% करमाफ डिव्हिडंड | ३२,००० |
| (३) इनव्हेस्टमेंट घसारा फंड | २,००० |
| (४) नोकरवर्गास बोनस | १०,५०० |
| (५) पुढील वर्षाच्या हिशेबांत | २७५ |
| | रु. ७३,२७५ |

बँकेचें वसूल भांडवल ६,५०,००० रु. असून खपलेल्या भांडवलापैकीं निम्में भांडवल वसूल केलेलें आहे. रिझर्व्ह व इतर फंड ३,८५,००० रु. चे आहेत. ठेवी १,२७,३२,५४२ रु. च्या आहेत. म्हणजे, ठेवींत साडेपांच लक्ष रुपयांची वाढ झाली आहे. बँकेनें ७० लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत बँकेच्या मुंबई येथें दोन व पुणें, नाशिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी ह्या ठिकाणीं शाखा आहेत.

**सहकारी संस्थांची स्थापना**—शेतकऱ्यांना पतीवर कर्ज मिळावें म्हणून बऱ्याच सहकारी संस्था स्थापन करण्याची तयारी केरळच्या सरकारनें दाखविली आहे. सहकारी सोसायट्यांच्याद्वारां रिझर्व्ह बँकेकडून कर्ज देण्याच्या पद्धतीचा स्वीकार करावा अशी सूचना मध्यवर्ती सरकारकडून राज्य सरकारला आली आहे.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | $2\frac{1}{2}$ टक्के |
| २ वर्षें | $2\frac{3}{4}$ टक्के |
| ३ वर्षें | ३ टक्के |
| ५ वर्षें | $3\frac{1}{2}$ टक्के |
| १० वर्षें | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २. ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.